राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी आनंदा कापसे
पो.रेठरे धरण, ता.वाळवा,जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (प) सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शिवाजी आनंदा कापसे
पो.रेठरे धरण, ता.वाळवा,जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. बी.बी.हरणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (प) सांगली, जि.सांगली श्री. अशोक मा. भालकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

**विवेचन**

आपण मागितलेल्या माहितीबाबत तीस दिवसांची विहित मुदत संपल्यानंतर पत्र मिळाले व त्यानंतर माहिती मिळाली. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे दि. ११.६.२००७ रोजी अपील केले. परंतु त्याचे साधे उत्तरही दिले नाही व अपीलही चालविले नाही. या कारणावरुन अपीलकर्ता श्री. शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहिती मिळण्यास विलंब झाला, तसेच प्रथम अपील केलेले असताना ते कार्यालयात प्राप्त झाले नसल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे म्हणणे चुकीचे व दिशाभूल करणारे आहे, असे प्रतिपादन श्री. कापसे यांनी केले. श्री. कापसे यांचा अर्ज दि. ३०.७.०७ चा असून शुल्क भरण्याबाबतचे पत्र त्यांना दि. २४.५.२००७ रोजी पाठविले. त्यांनी शुल्क न भरल्यामुळे माहिती दिली नाही. माहिती निःशुल्क देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. त्यानुसार माहिती निःशुल्क दिली, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) सांगली यांनी नमूद केले. दि. १३.६.२००७ चा श्री. कापसे यांचा अपील अर्ज कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे दिसून येते. दि.१९.११.२००७ रोजी ते स्वतः कार्यालयात आले असता त्यांनी अपील अर्जाची छायांकित प्रत अपिलीय प्राधिकाऱ्यांना सादर केली. त्यांच्या संमतीने त्याच दिवशी सुनावणी घेऊन विस्तृत चर्चा केली व जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क भरण्याचे पत्र विहित मुदतीत पाठविले असतानाही ते मुदतीत न मिळाल्याचे श्री. कापसे यांनी सांगितले, म्हणून माहिती निःशुल्क देण्याचा आदेश दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) सांगली यांनी लेखी व तोंडी केले. मात्र चर्चा झाली, सुनावणी झालेली नाही, असे श्री. कापसे यांनी नमूद केले.

दि.२४.५.२००७ रोजी श्री. कापसे यांना पत्र पाठविले असल्याची जावक बारनिशीतील नोंदीची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावी. प्रथम अपिलाची पोहच अपीलकर्त्याने सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री. अशोक मा.भालकर यांनी दि.१.९.२००८ च्या पत्रान्वये जावक बारनिशीची प्रत सादर केली. अपिलाची पोहच श्री. कापसे यांनी सादर केलेली नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विद्याधर केशरचंद दोशी
जीवन-तारा, १२६ मोरारजी पेठ, सरस्वती चौक, सोलापूर-४१३००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७३ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.सुभाष सावस्कर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१०४अ सिध्देश्वर पेठ, सोलापूर येथील सदनिकेमधील सदनिका क्र.एस-२ व सदनिका क्र.एस-१ यांच्या गच्चीवर एअरटेल कंपनीच्या मोबाइल टॉवरचे विनापरवाना बांधकाम सुरु असल्याबाबत श्री.वसंत गंगाधर नान्नजकर व श्री.पांडुरंग गंगाधर नान्नजकर यांनी अर्ज केला होता काय? दि.१०.४.२००६ रोजी स्मरणपत्र दिले होते काय, अशा तक्रारीबाबत किती दिवसात तपासणी पूर्ण करण्याचे आदेश आहेत, तपासणी केव्हा करण्यात आली, यासाठी कोणाकोणाचे ना हरकत प्रमाणपत्र लागते त्या कार्यालयाचे पत्ते, दूरध्वनी, सोलापूर महानगरपालिकेने टॉवर बांधकामास परवानगी दिली असल्यास क्रमांक व दिनांक, या प्रकरणात अनधिकृत बांधकाम पाडण्याची तत्परता दाखविण्यात आली काय, या प्रकरणात नगर अभियंता कार्यालयाने काय कारवाई केली, नसल्यास किती दिवसात कारवाई करणार, सदरची बाब झोनल ऑफिसर यांच्या नजरेस आणली होती काय व त्यांनी वरिष्ठांकडे याबाबत अहवाल सादर केला होता काय, असल्यास अहवालाची प्रमाणित प्रत, याबाबत शासन कोणती कारवाई व किती दिवसात करणार, सदनिका धारकांची यास मनाई असल्यास सदरचा टॉवर काढून टाकण्याबाबत एअरटेल यांना किती दिवसांची नोटीस देणार तसेच अतिक्रमण न काढल्यास मनपा किती दिवसात काढणार? प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे नाव, पद, पत्ता याबाबत माहिती. | |

## विवेचन

मोबाईल टॉवरच्या विनापरवाना बांधकामाबाबत दोन नागरिकानी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाहीची व संबंधित कायदाविषयक माहिती अपीलकर्ता श्री.विद्याधर केशरचंद दोशी यांनी दि.६.६.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१९.७.२००६ रोजी-म्हणजे १४ दिवस विलंबाने उत्तर दिले. दरम्यानच्या काळात माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.दोशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(स), सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. त्याच्या सुनावणीच्या दिवशीच श्री.दोशी यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे पुरवणी म्हणणे

सादर केले. पहिल्या अपिलाची सुनावणी झालेली असताना पुरवणी अर्जावर अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी ठेवणे बेकायदेशीर आहे, असे पत्र श्री.दोशी यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांना दिले. त्यानंतर काही पत्रव्यवहार झाल्यावर संपूर्ण माहिती देण्याची पूर्तता जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१३.९.२००६ रोजी केली. म्हणजेच ७३ दिवस उशिराने माहिती दिली. तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी निर्णय देण्यास ४३ दिवसांचा विलंब केला, असे श्री.दोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात नमूद केले असून जाणीवपूर्वक, जाणूनबुजून, विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी केली आहे.

दि.१७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. आपण दि.२.६.२००६ रोजी अर्ज केला व दि.५.७.२००६ पर्यंत माहिती न मिळाल्यामुळे दि.१८.७.२००६ रोजी अपील केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी श्री.सुभाष सावस्कर यांनी दि.१९.७.२००६ रोजी उत्तर पाठविले. त्यातही पूर्ण माहिती दिली नाही. आपण दि.१८.७.२००६ रोजी केलेल्या अपिलाची सुनावणी आधी दि.२९.७.२००६ रोजी ठेवली होती. ती बदलून दि.३१.७.२००६ रोजी ठेवल्याचे दि.२८.७.२००६ रोजी आपल्याला मोबाईलवर कळविण्यात आले. दि.३१.७.२००६ रोजी आपण अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे पुरवणी म्हणणे सादर केले. आवश्यक ती माहिती सत्वर देण्याचा व माहिती न देणाऱ्या कर्मचाऱ्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(२) नुसार कारवाई करावी, असा तोंडी आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला व लेखी आदेश दि.३०.९.२००७ रोजी दिला. दरम्यान दि.२२.८.२००६ रोजी आपल्याला पुन्हा सुनावणीस हजर राहण्याबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कळविले व त्याप्रमाणे आपण हजर राहिलो. जन माहिती अधिकाऱ्यांना दिलेल्या तोंडी आदेशानुसार पूर्तता न झाल्याबाबतचे पत्र दि.१२.९.२००६ रोजी आपण सादर केले व त्यानंतर दि.१६.९.२००६ रोजी राहिलेली माहिती आपल्याला देण्यात आली, असे तपशिलवार निवेदन श्री.दोशी यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाने केलेल्या विचारणेवर जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व अपीलकर्ता यांनी लेखी निवेदने सादर केली. 'एक बाब विशेषकरुन आयोगाचे निदर्शनास आणणे अत्यंत आवश्यक आहे. अशा अनधिकृत टॉवरची उभारणी काढून टाकण्याबाबत कारवाई महानगरपालिका अधिकारी यांनी आपले संदर्भित नमूद पत्र मिळेपर्यंत केलेली नव्हती. याचा पुरावा म्हणून अशा टॉवरचे अस्तित्वात असलेले व ते काढून टाकण्याचे कार्य नुकतेच सुरु असल्याबाबतच्या पुराव्याचे फोटो यासोबत जोडले आहेत,' असे श्री.दोशी यांनी दि.२०.११.२००७ च्या पत्रात नमूद केले असून सोबत छायाचित्रे पाठविली.

श्री.वसंत नान्नजकर व श्री.पांडुरंग नान्नजकर यांनी आपण राहत असलेल्या इमारतीच्या गच्चीवर एअरटेल मोबाईल कंपनीने टॉवर उभा केल्याची तक्रार व तो काढून टाकण्याची मागणी दि.१३.३.२००६ रोजी केली होती. लोकशाही दिनातही याबाबतची तक्रार त्यांनी केली होती व त्यांना त्याबाबत उत्तर देण्यात आले होते. इमारतीवरील टॉवर काढण्याची नान्नजकर बंधूंची मागणी होती. या संदर्भात श्री.दोशी यांनी माहितीची मागणी केली होती. त्यांच्या दि.६.६.२००६ च्या अर्जानुसार उपलब्ध माहिती त्याना दि.१९.७.२००६ रोजी देण्यात आली. दि.३१.७.२००६ रोजी त्यानी केलेल्या दुसऱ्या अर्जात जादा माहितीची मागणी केली होती. त्यात बरीचशी माहिती मूळ अर्जातील माहितीव्यतिरिक्तची, तसेच पुढील कार्यवाहीबाबतची होती. तरीही दि.१२.९.२००६ च्या पत्रान्वये त्यांना ती माहिती देण्यात आली. जाणूनबुजून माहिती टाळण्याचा हेतू नसल्याचे यावरुन स्पष्ट होईल. तसेच दरम्यानच्या कालावधीत नोव्हेंबर २००७ मध्ये एअरटेल कंपनीने टॉवर स्वतःहून काढून घेतलेला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता श्री.सुभाष सावस्कर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(स) श्री.अनिल विपत यांनी दि.२०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज व अपिलाबाबतच्या विहित पध्दतीचे पालन अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या तिघांनीही केलेले नाही, असे दिसते. श्री.दोशी यांच्या अर्जाला जन माहिती

अधिकारी श्री.सावस्कर यांनी ३० दिवसांत उत्तर न देता १४ दिवस विलंबाने उत्तर दिले आहे. मात्र मूळ अर्जानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे त्यात दिली आहेत.

श्री.दोशी यांच्या मूळ अर्जातील काही मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये दिलेल्या 'माहिती' च्या व्याख्येत बसत नाहीत.

उदा.(७)विनापरवाना झोपडपट्टी, खोकी आढळून आल्यास तत्पर मनपा ते बुलडोझरने पाडण्याची व्यवस्था, आयुक्त, नगर अभियंता, जनसंपर्क अधिकारी जातीने हजर असे वृत्तदर्शन चित्रीकरणात जसे दिसते, तितकीच तत्परता निदान नागरिकांनी निदर्शनास आणल्यानंतर दाखविली जाते काय, असल्यास या प्रकरणात तत्परता केव्हा दाखविण्यात आली याबाबत माहिती मिळावी.

(८)या प्रकरणी 'नगर अभियंता' कार्यालयामार्फत काही कारवाई करण्यात आली असल्यास त्याबाबत माहिती मिळावी. नसल्यास आता तरी काही कृती करण्याचा व किती दिवसात याबाबत माहिती मिळावी.

(९)विभागवार झोनल ऑफिसर्स यंची नेमणूक असते. या प्रकरणी (टॉवर ही काही साधी बाब नाही) सदरची अनधिकृत बाब झोनल ऑफिसर यांचे नजरेस आली होती काय व त्याने आपल्या वरिष्ठांकडे याबाबत अहवाल सादर केला होता काय? असल्यास त्या अहवालाची प्रमाणित प्रत मिळावी. अहवाल सादर केला नसल्यास सदरची घटना अक्षम्य नसल्याने शासन पुढे कोणती कारवाई व किती दिवसात करणार याबाबत माहिती मिळावी.

(१०)सदनिका धारकांची यास मनाई असल्यास सदरचा टॉवर काढून टाकण्याबाबत एअरटेल यांना किती दिवसांची नोटीस देणार याबाबत, तसेच दिलेल्या मुदतीत एअरटेल यांनी न काढल्यास असे अतिक्रमण मनपा किती दिवसात काढणार याबाबत माहिती मिळावी.

श्री.दोशी यांनी दि.३१.७.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(स), सोलापूर महानगरपालिका यांना सादर केलेल्या 'पुरवणी म्हणण्या'मध्ये मूळ अर्जाच्या व्यतिरिक्त भाष्य वा खुलासा अशा स्वरुपाची अतिरिक्त माहितीची मागणी केली आहे, हे जन माहिती

अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे. या पुरवणी म्हणण्यामध्ये मुख्यतः अपीलकर्त्यांची मते, कार्यवाहीविषयक भाष्य व अपेक्षा विस्तृतपणे दिलेल्या आहेत.

उदा.(५) माहिती अधिकारी यांची माहिती पृ.क्र.११ वरील क्र.१ वर अवलोकन करता त्यास होय अशी माहिती दिलेली आहे. याचाच अर्थ मार्च-२००६ मध्ये तक्रारी अर्ज दाखल करुनही मे व जून-२००६ मध्ये म्हणजे दोन महिन्यानंतर या प्रकरणी तपासणी करण्यात आलेली आहे. इतकेच काय, परंतु त्या टॉवरला विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा दिलेला नसल्याने दि.२१.३.२००६ पासून जनरेटरचा वापर करुन प्रक्षेपण सुरुही करण्यात आलेले आहे, ही बाब मे, जून २००६ च्या तपासणीत आढळून आली नव्हती काय? जनरेटरच्या वापरामुळे इमारतीस व्हायब्रेशन वाढले असून लहान मुले गच्चीवर गेल्यास ते धोकादायकही ठरत आहे, ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरुन तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे, असे अपीलकाराचे मत आहे.

(६) माहिती अधिकारी यांनी त्यांचे माहितीच्या पत्रात (पृ.क्र.११ ते १४) क्र.५ मध्ये कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांचा ना हरकत दाखला घ्यावा लागतो, असे नमूद करण्यात आलेले आहे. आमच्या माहितीप्रमाणे मनपा अशा अनधिकृत बांधकामावर मनपाचे उत्पन्न बुडता कामा नये म्हणून आकारणी करु शकते. परंतु त्यांना अथवा अधीक्षक, अग्निशामक दल यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रश्न उद्भवत नाही व ही माहिती आमच्या मते दिशाभूल करणारी अशी जाणीवपूर्वक दिलेली आहे. ज्याप्रमाणे फॅक्टरीचे शेड इत्यादी लोखंडी स्ट्रक्चर उभारणी करुन केली जाते व त्याची योग्यता किती, कशी याबाबतचा इंजिनीअरचा अहवाल सादर झाल्यानंतर शहराचे नगर अभियंता हे तपासणी करुन ते उभारण्यास परवानगी देते व तद्नंतर त्याची तपासणी होऊन वापर परवाना दिला जातो. त्यानुसारच येथे फार तर व्हावयास हवे, व जे योग्य आहे. माहिती अधिकारी यांनी पृ.क्र.११ वर क्र.५ मध्ये दिलेली माहिती चुकीची, दिशाभूल करणारी, जाणीवपूर्वक खोटी माहिती दिली आहे, असे अपीलकाराचे स्पष्ट मत असून माहिती अधिकारी यांनी सदरची दिलेली माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कोणत्या कलमान्वये याबाबतही खुलासा करावा.

मूळ अर्जात मागितलेल्या माहितीविषयक अधिक तपशील, तसेच खुलासा, स्पष्टीकरण याची मागणी अपिलात करणे नियमानुसार योग्य नाही. तसेच अशा प्रकारचे पुरवणी म्हणणे हा मूळ अर्जाचा भाग मानण्याचे अपीलकर्त्याचे प्रतिपादन मान्य करता येणार नाही. स्वतंत्र अर्ज असेच त्याचे स्वरुप ठरेल. टॉवर उभारणीबाबत आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता महानगरपालिकेने केली नाही, म्हणून माहिती चुकीची, असे म्हणणे व कार्यवाहीविषयक आक्षेपांचे स्पष्टीकरण मागणे हा भाग 'माहिती' या सदरात येणार नाही. त्यामुळे पुरवणी मागणीच्या अर्जावर दिलेल्या माहितीची पूर्तता ही मूळ अर्जावरील माहितीची पूर्तता असे मानून ७३ दिवसांचा विलंब गृहीत धरावा, हे अपीलकर्त्याचे म्हणणे रास्त नाही. मात्र मूळ अर्जावरील माहिती देण्यासही १४ दिवस विलंब झाला आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंत्यांकडे दैनंदिन कामकाजाची प्रचंड व्याप्ती व सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीची दि.२०.१.२००६ रोजी सुरु होऊन दि.२.२.२००७ रोजी समाप्त झालेली प्रक्रिया ही माहिती देण्यास झालेल्या विलंबाची कारणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अनेक अपिलांमध्ये नोंदविली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही न करण्याला ही सबब सरसकट मान्य करता येणार नाही.

सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा आवेक्षक, नगर अभियंता कार्यालय, सोलापूर महानगरपालिका श्री.एस.एन.लामकाने हे विलंबाला जबाबदार असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.एस.बी.कारंजे व अपिलीय प्राधिकारी श्री.अनिल विपत यांनी दि.१७.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविले असून श्री.लामकाने यांची वेतनवाढ एक वर्षासाठी बंद करण्यात आल्याचे व अपीलकर्त्यास माहिती नि:शुल्क दिल्याचे नमूद केले आहे. याच आशयाचे निवेदन दि.२०.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता श्री.सुभाष सावस्कर यानी आयोगाला सादर केले आहे. त्यासोबत श्री.लामकाने यांना दिलेल्या लेखी सूचना व ज्ञापन यांच्या प्रती त्यांनी सादर केल्या आहेत. श्री.दोशी यांचा मूळ अर्ज दि.६.६.२००६ चा आहे. श्री.लामकाने यांना दिलेल्या सूचनांच्या तारखा दि.७.४.२००६,

दि.२१.४.२००६ व दि.९.१.२००७ अशा आहेत. त्यातही १६५/६ रेल्वेलाईन येथील अनधिकृत बांधकामाबाबत श्री.दोशी यांनी माहितीसाठी केलेल्या अर्जांचा संदर्भ प्रामुख्याने आहे. श्री.लामकाने यांच्याविरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, कलम ५६(२)(ब) अन्वये कारवाई करुन दि.१२.७.२००७ ते दि.११.७.२००८ या कालावधीसाठी त्यांची वेतनवाढ बंद करण्यात आलेली होती. त्यांच्यावर अशा प्रकारची कारवाई झालेली आहे. परंतु प्रस्तुत अपिलात माहिती देण्यास झालेल्या १४ दिवसांच्या विलंबाला श्री.लामकाने जबाबदार असल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी नेमकेपणाने त्याबाबत त्यांना सूचना दिल्याचे कागदपत्रांवरुन सिध्द होत नाही. त्यामुळे ही जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांचीच ठरते व ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.विद्याधर दोशी यांना माहिती देण्यासाठी १४ दिवसाचा विलंब झाला असल्याने जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका श्री.सुभाष सावस्कर यांना रु.३००० (१४X२५०) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. श्री.सावस्कर यांच्याकडून ही शास्ती त्यांना ऑक्टोबर २००९ महिन्यात मिळणाऱ्या सप्टेंबर २००९ च्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही महापालिका आयुक्त, सोलापूर महानगरपालका, सोलापूर यांनी करुन, तसेच या बाबींची त्यांच्या गोपनीय अहवाल व सेवापुस्तकात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रतीसह अहवाल आयोगाला १०.१०.२००९ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.४.९.२००९**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. काशिनाथ रघुनाथ कुलकर्णी
३५०, गावभाग, सांगली, जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, जि. सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७६/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. काशिनाथ रघुनाथ कुलकर्णी
३५०, गावभाग, सांगली, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, जि. सांगली श्री. ता.म. जेंगटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.६.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सांगली जिल्हयातील २५ उपसा सिंचन योजना (धडक योजना) पाटबंधारे खात्याने शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., सांगली यांना विकत दिल्याच्या संदर्भात माहिती

## विवेचन

सांगली जिल्हयातील २५ उपसा सिंचन योजना (धडक योजना) पाटबंधारे खात्याने शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्या., सांगली यांना विकत दिल्याच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती वेळेत दिली नाही. एका मुद्दयाची माहिती अपूर्ण दिली. त्याबाबत आपण दोन अपिले अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केली. त्यांच्या आदेशानंतरही आपल्याला खोटी व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. काशिनाथ रघुनाथ कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केले आहे.

श्री. कुलकर्णी यांना शुल्काबाबत विहित मुदतीत कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही. त्यामुळे माहिती दिली नाही, असा अहवाल आपण वरिष्ठांकडे सादर केला. श्री. कुलकर्णी यांनी दिलेल्या पत्यावर ते राहत नसल्याचा शेरा मारुन टपाल परत आले. त्यानंतर श्री. कुलकर्णी यांनी अपील केले. दरम्यान शुल्काबाबतचे दुसरे पत्र मिळाल्यानंतर शुल्क भरुन त्यांनी माहिती घेतली, असे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळीच सांगितले. मात्र माहिती अपुरी असल्याच्या कारणावरुन सुनावणीच्या दिवशीच त्यांनी दुसरे अपील दाखल केले. त्यांना हवी असलेली सर्व माहिती देण्याच्या आदेशासह दोन्ही अपिले निकाली काढण्यात आली, असे लेखी निवेदन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता सांगली श्री. ख.आ.अन्सारी यांनी सादर केले. श्री. कुलकर्णी हे पाटबंधारे खात्यातून शाखा अभियंता या पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. शेतकरी सह. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात त्यांची जमीन आहे. त्या संदर्भातील वादातून श्री. कुलकर्णी हे अधिकाऱ्यांना त्रास देण्यासाठी असे अर्ज करतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ श्री. ता. म. जेंगटे यांनी लेखी व तोंडी केले.

श्री. कुलकर्णी यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२, ३, ४ पाहता अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. अन्य माहिती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेंद्र सोपानराव जाधव
गित गोविंद, १३२, शिवाजी हौसिंग सोसायटी,
कराड, जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग,पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. राजेंद्र सोपानराव जाधव<br>गित गोविंद, १३२, शिवाजी हौसिंग सोसायटी,<br>कराड, जि. सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | सहाय्यक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग,पुणे श्री. सुभाष गोसावी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, जि. सातारा<br>तर्फे प्रतिनिधी श्री. ए.एन. मुल्ला, अभियंता |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

रस्त्यावरील झोपडपट्टी अतिक्रमणाबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. रस्त्यावरील झोपड्या पाडण्याचा आदेश शासनाने दिला आहे. परंतु वारंवार अर्ज करूनही वीस वर्षांपासून बेकायदेशीर अतिक्रमण असलेल्या झोपड्या पाडल्या नाहीत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. राजेंद्र सोपानराव जाधव यांनी केले.

संबंधित विषयातील मुद्देनिहाय सर्व माहिती श्री. जाधव यांना विहित मुदतीमध्ये देण्यात आली. त्यांचा मुख्य मुद्दा अतिक्रमणाच्या कार्यवाहीबाबतचा असून त्याबाबत त्यांच्याशी समक्ष चर्चा करून आवश्यक ती माहिती दिली. तसेच या संदर्भात सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्याची तयारीही दर्शविली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड यांनी केले.

शासन परिपत्रकात रस्त्यावरील अतिक्रमण न काढण्याबाबत कोणताही उल्लेख नाही, त्यामुळे नगरपरिषदेने केलेली कारवाई चुकीची आहे व त्यानुसार दिलेली माहिती चुकीची आहे, असे श्री. जाधव यांचे प्रतिपादन आहे. केलेली कार्यवाही योग्य की अयोग्य, हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २३.१२.२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३८० / सातारा | श्री. आबाजी हिरालाल गायकवाड निलदिप निवास, साई मंदिरामागे, जाधववाडी (फ), ता. फलटण, जि. सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत जाधववाडी (फ), ता. फलटण, जि. सातारा | गट विकास अधिकारी (वर्ग १), पंचायत समिती फलटण, ता. फलटण, जि. सातारा | मागासवर्गीय दलितवस्ती सुधार योजनेतंर्गत समाज मंदिर बांधून मिळणेबाबतच्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती |
| | | **निष्कर्ष :-** १) आयोगाकडे सादर केलेल्या अपिलासोबत विहित मुद्रांक शुल्क (रु. २०/-) जोडलेले नाही. २) अर्जावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. | | | |
| २. | ४१७ / सातारा | कु. रेखा विनायकराव आहेरराव ३२८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा | सहायक निबंधक सहकारी संस्था, फलटण, जि. सातारा | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा | सन १९९७ ते दि ३१-३-२००८ अखेर 'अर्बन बझार' ची माहिती सहकार कायद्याच्या कलम ३२ अन्वये मिळण्याबाबत व उपोषणामध्ये लेखी आश्वासन दिल्याप्रमाणे माहिती का दिली नाही याबद्दल सविस्तर खुलासा मिळावा. |

| | | |
|---|---|---|
| | | **निष्कर्ष :-** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका, पतसंस्था व तत्सम सहकारी संस्थाना लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिला आहे. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. ती त्यांनी अर्जदारास देणे बंधनकारक आहे. २) लेखी आश्वासनाबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांत अपील कर्त्यास द्यावी. |

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ व २ (अपील क्रमांक ३८०/सातारा व ४१७/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील दोन्ही अपिलांतील निष्कर्षात आदेशित केल्यानुसार त्वरित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मुदतपूर्तीनंतर आठ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शास्तीस व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०९-२००९

| | | |
|---|---|---|
| | | **निष्कर्ष :-** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका, पतसंस्था व तत्सम सहकारी संस्थाना लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिला आहे. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. ती त्यांनी अर्जदारास देणे बंधनकारक आहे. २) लेखी आश्वासनाबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांत अपील कर्त्यास द्यावी. |

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ व २ (अपील क्रमांक ३८०/सातारा व ४१७/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील दोन्ही अपिलांतील निष्कर्षात आदेशित केल्यानुसार त्वरित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मुदतपूर्तीनंतर आठ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शास्तीस व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रमोद धोंडीराम पवार
राजकमल मेडिकल्स, व्यंकटेशवर्धन अपार्टमेंट,.
गणेशनगर, अनंतगंगा मंगल कार्यालया जवळ, सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
आरोग्य सेवा,नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
सह संचालक, आरोग्य सेवा,नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८०/ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक,
आरोग्य सेवा,नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी
श्री. चंद्रशेखर रंगप्पा मंजल

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
सह संचालक, आरोग्य सेवा,नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१
श्री. चंद्रशेखर रंगप्पा मंजल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.६.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१२ वर्षे सलग सेवा झालेल्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वर्ग-३ संवर्गातील वैद्यकिय अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेनुसार रूपये ८०००-१३५००/- वेतनश्रेणी दि. १.१०.२००१ पासून देण्याबाबत झालेला विलंब / नकारार्थी कार्यवाहीबाबतची सविस्तर माहिती

## विवेचन

वैद्यकीय अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेनुसार प्रथम वेतनश्रेणी देण्यातील विंलब अथवा नकार याबाबत आपण मागितलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली. पदोन्नती नाकारण्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे अर्ज असतील तर शिफारस करुन शासनाकडे पाठविणे आवश्यक होते, तसे पाठविले नाही. त्यांच्या विनंतीचा विचार का करण्यात आला नाही, असे मुद्दे उपस्थित करुन अपीलकर्ता श्री. प्रमोद धोंडीराम पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. पवार यांनी विचारणा केलेले अनेक मुद्दे खुलासा मागणारे अथवा भाष्य करणारे आहेत. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क न भरताच त्यांनी प्रथम अपील केले. सुनावणीला ते उपस्थित राहिले नाहीत. तसेच सुनावणीला बोलाविण्याचा तुम्हाला अधिकार नाही, असे त्यांनी कळविले. त्यामुळे गुणवत्तेवर त्यांचे अपील फेटाळण्यात आले. दरम्यानच्या काळात पदोन्नती नाकारणाऱ्या ९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेतंर्गत सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय केल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी श्री. चंद्रशेखर रंगप्पा मंजल यांनी सादर केले. श्री. पवार स्वत: सुनावणीला हजर राहत नाहीत, तसेच समक्ष येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या नावाने अन्य कोणती तरी व्यक्ती ही माहिती मागत असावी व श्री. प्रमोद धोंडीराम पवार या नावाची व्यक्ती अस्तित्वात आहे की नाही अशी शंका येते, असे प्रतिपादन श्री. मंजल यांनी सुनावणी दरम्यान केले. ही बाब गंभीर असल्यामुळे चौकशी करुन, आवश्यक तर वस्तुस्थितीबाबतचा पंचनामा करुन आयोगाला अहवाल सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार चौकशी केली असता श्री.प्रमोद धोंडीराम पवार नावाची व्यक्ती

प्रत्यक्षात असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा पुणे यांनी दि.१३.१०.२००८ च्या पत्रान्वये पंचनाम्याच्या प्रतीसह अयोगास अवगत केले. आपल्याला माहिती मिळाली असून न्याय मिळाला आहे, व त्यांच्याविरुध्द काहीही तक्रार नाही, असे लेखी निवेदन श्री. प्रमोद धोंडीराम पवार यांनी दि.२१.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ .९.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अजय भागोजी कांबळे
मु.पो.शिरवळ, ता. खंडाळा,जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खंडाळा, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | ५.२.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अजय भागोजी कांबळे
मु.पो.शिरवळ, ता. खंडाळा,जि.सातारा तर्फे प्रतिनिधी

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
खंडाळा, जि. सातारा श्री. विजयसिंह जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा श्री. बाळू नामदेव खुंटे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. सिटी सर्व्हे क्र.७७७ मधील दवाखान्याच्या ग्रामपंचायत उताऱ्यावर १२६४.६ चौ.मी. इतकी जागा आहे का ?
२. जर इतकी जागा त्या ग्रामपंचायतीच्या उताऱ्यावर नसेल तर बाकीची रिकामी जागा कोणाच्या नावावर आहे व ती त्याच्या नावावर कशी आली याची पुरेपूर माहिती व उताऱ्याची प्रत
३. सिटी सर्व्हे क्र.७७७ ह्या जागेची मागणी मागासवर्गीयांच्या कुठल्या कामासाठी केली आहे व किती जनांचे अर्ज आले आहेत व याची झेरॉक्स प्रत इ. आठ मुद्दे

## विवेचन

मौजे शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा येथील सिटी सर्व्हे क्र.७७७ च्या संदर्भात जन माहिती अधिका-यांनी महत्त्वाची माहिती लपविली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही, या कारणावरून अपीलकर्ता श्री. अजय भागोजी कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

संबंधित जागेतून रस्ता देण्याची शिरवळ ग्रामपंचायतीची तयारी का नाही, असा श्री. कांबळे यांचा मुख्य प्रश्न असून त्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत लेखी देऊन प्रत्येक मुद्दयांचे स्पष्टीकरण करण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी शिरवळ श्री बाळू नामदेव खुंटे यांनी नमूद केले. श्री. खुंटे यांनी या जागेतील मिळकतीवरील नोंद लपविली आहे. ही जागा कोणाच्याच नावावर नसेल तर तिथे सरकारचे नाव असले पाहिजे किंवा खाजगी मालकाचे नाव असले पाहिजे. परंतु कोणाचेच नाव दाखल नाही, असे उत्तर श्री. खुंटे यांनी दिले आहे, असे प्रतिपादन श्री. कांबळे यांनी केले. सोबत काही कागदपत्रे त्यांनी सादर केली. मिळकत क्र.६७४ च्या बाजूला ६७६ हा मिळकत क्रमांक आहे व या मिळकत उता-यावर अनुसया बबन कांबळे यांचे नाव आहे, ती माहिती लपविली आहे. दवाखाना बांधून व त्याचे कुंपण बांधून ऊर्वरित जागा स्थानिक लोकांना नदीवरुन पाणी आणण्यासाठी मोकळी ठेवली होती, याचा आपण स्वत: हाच पुरावा आहोत, असे श्री. कांबळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. संबंधित जागेवर ग्रामपंचायतीकडे दवाखाना म्हणून नोंद आहे. अनुसया बबन कांबळे यांच्या नावाची नोंद गेल्या वीस वर्षां - पासून असली तरी श्री. कांबळे म्हणतात तीच ती जागा असे सांगता येणार नाही, असे प्रतिपादन श्री. खुंटे यांनी केले.

श्री. कांबळे हा विषय विविध पातळ्यांवर मांडत आले असून जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना योग्य माहिती दिली आहे. शासकीय जागेतून त्यांना हवा असलेला रस्ता देता येत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा श्री. विजयसिंह जाधव यांनी नमूद केले. श्री. कांबळे यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. कांबळे यांना विहित मुदतीत माहिती दिली आहे. संबंधित मिळकत कोणती याबद्दलच्या नोंदी योग्य की अयोग्य, रस्ता देता येईल की नाही, हा

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तसेच श्री. कांबळे यांच्या अर्जातील मुदा क्र. ३, ६, ८ हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाहीत. ( उदा. मुद्दा क्र.८ - मौजे शिरवळ गावामधील इलेक्ट्रिक बोर्डाचे लोड शेडिंग चालू असताना नळाला पाणीही येत नाही व आम्हाला या जागेच्या जवळच नदी आहे, व आम्हाला पाणी तेथून आणावे लागते व तेथील नागरिकांना बाहेर ये - जा करण्यासाठी दुसरा रस्ताच नाही व आम्हा ग्रामस्थांचे फार हाल चालले आहेत व शिरवळ ग्रामपंचायतीची रस्ता देण्याकरिता तयारी का नाही याचे स्पष्टीकरण करणे व तेथील खाजगी मालकांनीही ग्रामस्थांचा कधीही रस्ता अडवणूक केलेली नाही याची पुरेपूर माहिती. ) श्री. कांबळे यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने संबंधित नागरिकांना रस्ता उपलब्ध करून देण्याबाबतच्या कार्यवाहीविषयी सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी देणे उचित ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०८.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अजय भागोजी कांबळे
मु.पो.शिरवळ, ता. खंडाळा,जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खंडाळा, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | ५.२.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अजय भागोजी कांबळे
मु.पो.शिरवळ, ता. खंडाळा,जि.सातारा तर्फे प्रतिनिधी

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
खंडाळा, जि. सातारा श्री. विजयसिंह जाधव

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा श्री. बाळू नामदेव खुंटे

<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

१. सिटी सर्व्हे क्र.७७७ मधील दवाखान्याच्या ग्रामपंचायत उताऱ्यावर १२६४.६ चौ.मी. इतकी जागा आहे का ?

२. जर इतकी जागा त्या ग्रामपंचायतीच्या उताऱ्यावर नसेल तर बाकीची रिकामी जागा कोणाच्या नावावर आहे व ती त्याच्या नावावर कशी आली याची पुरेपूर माहिती व उताऱ्याची प्रत

३. सिटी सर्व्हे क्र.७७७ ह्या जागेची मागणी मागासवर्गीयांच्या कुठल्या कामासाठी केली आहे व किती जनांचे अर्ज आले आहेत व याची झेरॉक्स प्रत इ. आठ मुद्दे

## विवेचन

मौजे शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा येथील सिटी सर्व्हे क्र.७७७ च्या संदर्भात जन माहिती अधिका-यांनी महत्त्वाची माहिती लपविली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही, या कारणावरून अपीलकर्ता श्री. अजय भागोजी कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

संबंधित जागेतून रस्ता देण्याची शिरवळ ग्रामपंचायतीची तयारी का नाही, असा श्री. कांबळे यांचा मुख्य प्रश्न असून त्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत लेखी देऊन प्रत्येक मुद्दयांचे स्पष्टीकरण करण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी शिरवळ श्री बाळू नामदेव खुंटे यांनी नमूद केले. श्री. खुंटे यांनी या जागेतील मिळकतीवरील नोंद लपविली आहे. ही जागा कोणाच्याच नावावर नसेल तर तिथे सरकारचे नाव असले पाहिजे किंवा खाजगी मालकाचे नाव असले पाहिजे. परंतु कोणाचेच नाव दाखल नाही, असे उत्तर श्री. खुंटे यांनी दिले आहे, असे प्रतिपादन श्री. कांबळे यांनी केले. सोबत काही कागदपत्रे त्यांनी सादर केली. मिळकत क्र.६७४ च्या बाजूला ६७६ हा मिळकत क्रमांक आहे व या मिळकत उता-यावर अनुसया बबन कांबळे यांचे नाव आहे, ती माहिती लपविली आहे. दवाखाना बांधून व त्याचे कुंपण बांधून ऊर्वरित जागा स्थानिक लोकांना नदीवरुन पाणी आणण्यासाठी मोकळी ठेवली होती, याचा आपण स्वत: हाच पुरावा आहोत, असे श्री. कांबळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. संबंधित जागेवर ग्रामपंचायतीकडे दवाखाना म्हणून नोंद आहे. अनुसया बबन कांबळे यांच्या नावाची नोंद गेल्या वीस वर्षां - पासून असली तरी श्री. कांबळे म्हणतात तीच ती जागा असे सांगता येणार नाही, असे प्रतिपादन श्री. खुंटे यांनी केले.

श्री. कांबळे हा विषय विविध पातळ्यांवर मांडत आले असून जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना योग्य माहिती दिली आहे. शासकीय जागेतून त्यांना हवा असलेला रस्ता देता येत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा श्री. विजयसिंह जाधव यांनी नमूद केले. श्री. कांबळे यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. कांबळे यांना विहित मुदतीत माहिती दिली आहे. संबंधित मिळकत कोणती याबद्दलच्या नोंदी योग्य की अयोग्य, रस्ता देता येईल की नाही, हा

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तसेच श्री. कांबळे यांच्या अर्जातील मुदा क्र. ३, ६, ८ हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत येत नाहीत. ( उदा. मुद्दा क्र.८ - मौजे शिरवळ गावामधील इलेक्ट्रिक बोर्डाचे लोड शेडिंग चालू असताना नळाला पाणीही येत नाही व आम्हाला या जागेच्या जवळच नदी आहे, व आम्हाला पाणी तेथून आणावे लागते व तेथील नागरिकांना बाहेर ये - जा करण्यासाठी दुसरा रस्ताच नाही व आम्हा ग्रामस्थांचे फार हाल चालले आहेत व शिरवळ ग्रामपंचायतीची रस्ता देण्याकरिता तयारी का नाही याचे स्पष्टीकरण करणे व तेथील खाजगी मालकांनीही ग्रामस्थांचा कधीही रस्ता अडवणूक केलेली नाही याची पुरेपूर माहिती. ) श्री. कांबळे यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने संबंधित नागरिकांना रस्ता उपलब्ध करून देण्याबाबतच्या कार्यवाहीविषयी सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी देणे उचित ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
पुणे खंडपीठ

**पुणे**
दि. ०९.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे-१

श्री.भास्कर पायगोंडा कोगनोळे
१६०५, गणेश नगर, रोड नं.४, सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली

**जन माहिती अधिकारी तथा** ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कवठे एकंद, ता.तासगाव, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९४ / सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक | २२.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** गैरहजर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली

**जन माहिती अधिकारी तथा** ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कवठे एकंद, ता.तासगाव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३१.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २८.०६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ११.०२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ०२.०९.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** : मौजे कवठे एकंद येथील गट नं.१२२० मधील खुल्या जागेचे ॲसेसमेंट उतारे ग्राम पंचायत नावे कोणत्या अधारे करण्यात आली, त्यासाठी कोणत्या सक्षम अधिका-याचे आदेश प्राप्त झाले त्याची प्रत.

# विवेचन

अपीलकर्ता श्री. भास्कर पायगोंडा कोनगोळे यांनी मौजे कवठेएकंद येथील गट नं. १२२० मधील खुल्या जागेचे ॲसेसमेंट उतारे ग्राम पंचायत नावे कोणत्या आधारे करण्यात आला, यासाठी सक्षम अधिकारी कोण, इत्यादी माहिती मागितली होती. विशेष अपिल निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली असल्याची पोहोच सादर केली आहे.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :-

**आदेश :-**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे

दि. १८.०९.२००९

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. युवराज सिद्राम पवार
१९०/ ४०, साठे नगर, एस.टी. कॉलनी समोर,
सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

अपिलीय प्राधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी
तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.०६. २००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता :-** श्री. युवराज सिद्राम पवार<br>१९०/४०, साठेनगर, एस. टी. कॉलनी समोर, सोलापूर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा :-** शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री. एम. एन. वीर<br>**जन माहिती अधिकारी तथा :-** उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री. एस के. सगरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि २९.०८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१०. २००६ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>उत्तर सोलापूर तालुक्यातील २००१ साली अनुदान दिलेल्या प्रशालांची यादी व त्या प्रशांलांतील कर्मचा-यांच्या मान्यता पत्रांच्या प्रती. तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील फेब्रुवारी २००१ साली अनुदान दिलेल्या शाळांतील जून १९९८ ते एप्रिल २००१ पर्यंतच्या वार्षिक तपासणी अहवालांच्या प्रती. | |

## विवेचन

आयोगाने आयोजित केलेल्या दि.१८.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. माहिती मिळाल्यानंतर अपील निकाली काढण्याची विनंती अपीलकर्ते श्री. युवराज सिद्राम पवार यांनी प्रपत्रात नमूद केली. माहितीबाबत उभय घटकांनी आयोगास अवगत न केल्याने दि. ३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दि. १६.७.०८ रोजी माहिती मिळाल्याची अपीलकर्त्याची पोच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२५.०९.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. प्रशांत बळवंत साळुंखे, ५/२७९, सुंदर बागेजवळ, डांगरे बिल्डिंग, इचलकरंजी यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :-

| अ क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|
| १ | ३९७/ कोल्हापूर | मॅनेजर, दि. इचलकरंजी इंडस्ट्रियल को-ऑप, इस्टेट लि., १८/१३३, उद्योग नगर, दि इचलकरंजी अर्बन बँक समोर, इचलकरंजी | अध्यक्ष, दि. इचलकरंजी इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट लि. १८/१३३, उद्योग नगर, दि इचलकरंजी अर्बन बँक समोर, इचलकरंजी | दि इचलकरंजी अर्बन को-ऑप बँक इचलकरंजी व दि इचलकरंजी को-ऑप इस्टेट लि. इचलकरंजी या सहकारी संस्थेशी संबंधित एकुण ७ मुद्दयांची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रशांत बळवंत साळुखे यांनी जन माहिती अधिकारी तथा मॅनेजर दि इचलकरंजी इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट लि. १८/१३३, उद्योग नगर, दि. इचलकरंजी अर्बन बँक समोर, इचलकरंजी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने प्रथम अपील न करता आयोगाकडे अपील केले आहे. सदर अपिलाचा समावेश दिनांक ११-११-२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात अपीलकर्ते श्री. साळुंखे व जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केलेला तपशील पाहता मूळ अर्जातील माहितीची मागणी व अपिलातील मागणी यात तफावत आहे. अपीलकर्त्याने असे करणे योग्य नाही. मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये मागणी केलेली माहिती ही 'दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँके' शी संबंधित आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. उर्वरित दि इचलकरंजी इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट लि. या संस्थेशी संबंधित

मागणी केलेली माहिती अर्जदारास देणे संस्थेवर बंधनकारक आहे व ती देण्याची तयारी असून अपीलकर्ता नेत नसल्याचे चेअरमन व मॅनेजर दि इचलकरंजी इंडस्ट्रियल को-ऑप इस्टेट लि. इचलकरंजी यांनी त्यांच्या निवेदनामध्ये नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.अकाराम शिवाजी जाधव
सचिव, कार्वे धानाई उपसा जलसिंचन सहकारी सेवा सोसायटी मर्या.
कार्वे, ता.कराड, जिल्हा-सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,कार्वे धानाई उपसा जलसिंचन
सहकारी सेवा सोसायटी मर्या.कार्वे, ता.कराड, जिल्हा-सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०५/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | १६.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सतीश उत्तम थोरात (मूळ अर्जदार)
मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.एस.एस.संकपाळ

**जन माहिती अधिकारी तथा** सचिव,कार्वे धानाई उपसा जलसिंचन सहकारी सेवा सोसायटी मर्या.कार्वे, ता.कराड, जिल्हा-सातारा श्री.युसुफ गणी मुजावर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १९.३.०८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १०.४.०८ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

श्री. सतीश उत्तम थोरात यांना ते संस्थेचे सभासद नसतानाही त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती देणेबाबत उपनिबंधक, सहकारी संस्था कराड यांनी धानाई उपसा जलसिंचन सहकारी संस्था, कार्वे, ता.कराड, जि.सातारा यांना अर्जदार श्री. थोरात यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात दिलेल्या आदेशाविरुध्द अपील.

## विवेचन

धानाई उपसा जलसिंचन सहकारी संस्था, कार्वे, ता.कराड, जि.सातारा या संस्थेला कोणतेही शासकीय भाग भांडवल, अनुदान व सवलती मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, तरीही हा कायदा लागू असून अपीलकर्ता श्री.सतीश उत्तम थोरात यांना माहिती द्यावी असा आदेश , उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी प्रथम अपिलात दिला. त्याविरुध्द संस्थेचे सचिव श्री.आकाराम शिवाजी जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

उपरोक्त संस्था कृष्णा सहकारी साखर कारखान्याने प्रवर्तित केलेली असून योजनेचे ३५ लाख रुपये कर्ज भू-विकास बँकेने दिले. त्यातील पाच लाख रुपये केंद्र व राज्य सरकारकडून अनुदानापोटी मिळाले आहेत, असे प्रतिपादन मूळ अर्जदार श्री.थोरात यांनी केले. मात्र हे अनुदान संस्थेला मिळालेले नसून व्यक्तिगत शेतकऱ्यांना दिलेले आहे. शासनाने संस्थेला कोणतेही भागभांडवल दिलेले नाही. अशा सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे, असे सविस्तर लेखी निवेदन संस्थेचे सचिव व अध्यक्ष यांच्या वतीने ॲड.एस.डी.शिंदे यांनी आयोगाला अलाहिदा सादर केले आहे. ते लक्षात घेता संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे स्पष्ट होते. त्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आयोग

अपील मान्य करण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजाराम शंकरराव धारवट
द्वारा जयंती सायझर्स, १८/२०८, स्टेशन रोड,
आवळे पेट्रोल पंपाचे मागे, इचलकरंजी,जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर
जि. कोल्हापूर — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमि संपादन अधिकारी
क्र.१२, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १८.१२.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजाराम शंकरराव धारवट
द्वारा जयंती सायझर्स, १८/२०८, स्टेशन रोड,
आवळे पेट्रोल पंपाचे मागे, इचलकरंजी,जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर
जि. कोल्हापूर श्री. तुकाराम कासार

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमि संपादन अधिकारी
क्र.१२, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. दिपक क्षीरसागर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.७.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना भरपाई रकमेच्या पुनर्निर्धारण अर्ज नं.८०७/०४ दि. १३.७.२००४ संदर्भात आज अखेर केलेल्या सर्व आदेशांच्या प्रती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.१२.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

न्यायालयाच्या निवाडयाचे आधारे जमिनीच्या भरपाईची रक्कम आपल्याला मिळाली नाही, त्याबाबतच्या पुर्ननिर्धारण अर्जावर केलेल्या आदेशांची माहिती आपल्याला मिळाली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.राजाराम शंकरराव धारवट यांनी केले.

श्री. धारवट यांची मागणी महसूल नियमांतर्गत प्रशासकीय कार्यवाहीची आहे. जमिनीची किंमत पसंत नसल्यास वाढीव रकमेसाठी ते अपील करु शकतात, त्याबाबत कागदपत्रांची पुर्तता करावी, असे त्यांना कळविले असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१२, कोल्हापूर यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मूळ मागणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास मार्गदर्शन केले आहे. आणखीन माहिती आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करुन योग्य ते शुल्क

भरुन अपीलकर्त्याने प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

पुणे
दि. ३० .०६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४०८/ सोलापूर | श्री. शिरीषकुमार चंद्रहार धावणे मु. डिकसळ, पो. ~~माळे~~ मसले (चौ.) ता मोहोळ, जि. सोलापूर | तालुका कृषि अधिकारी, मोहोळ, जि. सोलापूर | उपविभागीय कृषि अधिकारी, सोलापूर | मौले वाळूज (दे.) येथील रोजगार हमी योजने अंतर्गत कामावरील मजुरांच्या उपस्थितीची माहिती. | माहिती देण्यास तयार असल्याचे कळवूनही माहिती घेण्यास अपीलकर्ते आले नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मोहोळ यांनी दि. २१.७.२००८ व ४.९.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | ४६४/ सोलापूर | श्री. सादिक अ. रशीद शेख १४, 'नाज', अंत्रोळीकर नगर क्र. १, सोलापूर | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. - १, सातरस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, कुमठा नाका, सोलापूर | सोलापूर शासकीय विश्रामगृह येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचा भुखंड व्यापारी तत्वावर विकसित करण्याच्या कामाचा मंजुर प्रकल्प अहवाल व निविदा पुस्तिका व शासकीय इमारतीच्या दुरस्तीचा खर्च इत्यादी. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि. १९.६.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ३ | ५८१/ सोलापूर | श्री. नामदेव पांडुरंग हांडे मु. पो. कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | अध्यक्ष, भैरवनाथ पाणलोट विकास समिती, भोगेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर | सन २००९ ते ऑक्टोबर २००६ पर्यंत समितीने केलेल्या मृदसंधारण व जलसंधारणाची एकूण कामे, त्यापैकी पूर्वी | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याचे दि. १९.६.२००८ चे निवेदन अपिलीय |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | झालेली कामे, कामाचे नाव, गाव, शेतक-यांचे नाव, भूमापन क्र, मंजूर रक्कम, झालेला खर्च, मजुरांच्या हजेरी - पत्रिकांच्या झेरॉक्स इत्यादी. | प्राधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर यांनी दि. ७.७.२००८ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केलेआहे. |
| ४ | ५९१/ सोलापूर | श्री. चंदा अजिनाथ भालेराव मु. वालवड, पो. चाटे, ता बार्शी, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वालवड, पो. चाटे, ता. बार्शी, जि. सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर | संपूर्ण रोजगार हमी योजना अंतर्गत येणारा निधी, ग्रामपंचायत विविध विकास निधी, खर्चाचे मस्टर, मासिक सभा इतिवृत्तांच्या नकला, धान्य वाटप कुपन व २००० ते २००५ कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल इत्यादी. | मागितलेल्या माहितीच्या सर्व नकला मिळाल्याची अपीलकर्त्याची पोच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वालवड यांनी दि. ३०.७.२००८ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केल... |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ (अपील क्र. ४०८ / सोलापूर, ४६४ / सोलापूर, ५८१/ सोलापूर व ५९१ / सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**

**दि.१५.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. जगन बापू वाडेकर
मु. केखले, पो. जाखले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, **उत्तरवादी**
कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय,
करवीर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८/१२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-१-२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २-२-२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७-२-२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०-४-२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - श्री. सदाशिव आकाराम गायकवाड व श्री. जगन बापू वाडेकर यांनी दि. २०-१०-२००७ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईची महिती. | |

**विवेचन**

जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कोल्हापूर यांनी चुकीची व दिशाभूल करणारी महिती दिल्याच्या कारणावरुन अपीलकर्ते श्री. जगन बापू वाडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. ११-११-२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभयघटकांमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

आवश्यक ती माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे व तक्रार नसल्याचे निवेदन अपीलकर्ते श्री. वाडेकर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४-०९-२००९